सकाळ पुणे [पिंपरी चिंचवड]

दि. १/१२/२०१०

पान नं. 2

# सिक्स सिग्माच्या साह्याने चीनवरही मात शक्य

## डॉ. साळवेकर यांचा विश्वास; सिक्स सिग्माचा उच्च शिक्षणात समावेश करावा

अजय गोरड : सकाळ वृत्तसेवा

पिंपरी, ता. ३० : सेवा व औद्योगिक क्षेत्रात अलीकडच्या काळात भारताने मोठी झेप घेतली आहे. तरीही गुणवत्ता व व्यवस्थापनाच्या निकषात इतरांच्या तुलनेत भारत मागे असून, या क्षेत्रात 'लीन सिक्स सिग्मा'सारख्या प्रणाली वापरल्यास चीनसारख्या देशावरही भारत मात करेल, असे मत अमेरिकास्थित डॉ. अरविंद साळवेकर यांनी व्यक्त केले.

आकुर्डीतील पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे आयोजित कार्यशाळेसाठी सिक्स सिग्मा प्रणालीचे तज्ज्ञ डॉ. साळवेकर आले होते. या वेळी 'सकाळ'शी बोलताना त्यांनी भारतासह इतर देशांतील औद्योगिक व सेवा क्षेत्राबद्दलचे आलेले अनुभव व काढलेली निरीक्षणे याबाबत सविस्तर माहिती दिली.

ते म्हणाले, "अमेरिका, जपान व चीनसारख्या राष्ट्रांनी उद्योगधंद्यात-विशेषतः ऑटो इंडस्ट्री, आरोग्य, सेवा क्षेत्रात 'सिक्स सिग्मा', कायझेनसारख्या प्रणालींचा वापर यशस्वीपणे करत कार्यपद्धतीत कमालीचा बदल घडवून आणला. म्हणूनच जपानसारख्या छोट्या राष्ट्रांचीही अर्थव्यवस्था भक्कम झाली. अमेरिकेने आपल्या गुणवत्तापूर्ण उत्पादनाने स्वतःला 'ब्रँड' बनविले आहे, तर चीन या जोरावर जगभर आपली उत्पादने स्वस्त विकत आहे. व्यवस्थापनशास्त्राशी निगडित वेगवेगळ्या संकल्पना राबविल्यानेच त्यांना यश मिळाल्याचे दिसते."

"भारतातील औद्योगिक उत्पादनात मोठ्या प्रमाणात गुणवत्ता आहे, मात्र त्याला तंत्रज्ञान व व्यवस्थापनशास्त्राशी निगडित असलेल्या संकल्पनांची जोड द्यायला हवी. त्यामुळे कमी वेळेत स्वस्त वस्तू बनविणे, त्यावर चांगला नफा कमविणे व या नफ्यामुळे चांगली सेवा देऊन जगाची बाजारपेठ काबीज करणे सहज शक्य आहे. जपानसारखी उच्च गुणवत्तेची उत्पादने बनविण्यासाठी भारतीय कंपन्यांनी अशा प्रणाली अवगत केल्या पाहिजेत. तसेच अशा प्रणालींचा उच्च शिक्षणात समावेश करून विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर याबाबत कार्यशाळा, चर्चासत्रे व परिसंवाद व्हायला हवेत. तरुणांना त्याचे महत्त्व शैक्षणिक काळात समजायला हवे."

डॉ. साळवेकर म्हणाले, "एकदा आपण अशा प्रणालीचा वापर सुरू केला की त्याबाबतचे महत्त्व कळून येते. भारतातील काही कंपन्या त्याचा वापर करत आहेत. मात्र तेथे काम करणाऱ्या लोकांना याबाबत अधिक माहिती, ज्ञान व प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. त्याद्वारेच 'डिफेक्टिव्ह प्रॉडक्ट', 'झीरो ॲक्सिडेंट', 'नो रिजेक्शन' अशा संकल्पना यशस्वीपणे राबवू शकतो."

### डॉ. साळवेकर 'नूमवि'चे विद्यार्थी



डॉ. अरविंद साळवेकर हे मूळचे पुण्यातील भवानी पेठेतील असून, त्यांचे शालेय शिक्षण नूतन मराठी विद्यालयात झाले. अकरावी व बारावी स. प. महाविद्यालयातून केल्यानंतर त्यांना शिवाजीनगरच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळाला. पुढे त्यांनी अमेरिकेतील विसकोनसीन विद्यापीठातून औद्योगिक अभियांत्रिकीत एम.एस. केले. सेंट क्लाऊड विद्यापीठात एम.बी.ए. तर, सिनसिनाटी विद्यापीठात त्यांनी औद्योगिक अभियांत्रिकीत पीएच.डी. मिळवली आहे. त्यांनी सिक्स सिग्मा याबाबतची अनेक पुस्तके लिहिली असून, 'अमेरिकन सोसायटी फॉर क्वालिटी'चे मार्गदर्शक आहेत.

Dr. D. Y. Patil Inst. of Management Studies LIBRARY

Atpadkar

D. Y. P. I. M. S. LIBRARIAN ०१/१२/२०१०